दक्षिण महाराष्ट्र
केसरी
सांगली, २३ सप्टेंबर २०१४

# वसुंधरा चित्रपट महोत्सवास आजपासून सुरुवात

सांगली : प्रतिनिधी

सांगली फिल्म सोसायटीच्यावतीने किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास आज मंगळवारपासून सुरुवात होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या चित्रपट महोत्सवात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेले १५ देशांतील ४० चित्रपट-लघुचित्रपट दाखवण्यात येणार आहेत, अशी माहिती वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव यांनी पत्रकार बैठकीत दिली. यावेळी उपाध्यक्ष अरुण दांडेकर, महेश कराडकर उपस्थित होते.

वसुंधरा महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात वसुंधरा मित्र सन्मान पुरस्कार निसर्गरक्षणाच्या चळवळीतील कार्यकर्ते, वन्यजीव छायाचित्रकार प्रदीप सुतार यांना, तर फोटोग्राफीची आवड असणाऱ्या प्रतिबिंब हौशी फोटोग्राफर संस्थेस देण्यात येणार आहे. समारोप कार्यक्रमात वसुंधरा सन्मान पुरस्कार एनर्जी सेव्हिंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रियदर्शनी कर्वे यांना देण्यात येणार आहे. याचबरोबर सकाळच्या सत्रात शहरातील सर्व शाळामधून आठ हजार मुलांसाठी हसत-खेळत पर्यावरण उपक्रम राबवण्यात येणार आहे.

महोत्सवाचे उद्घाटन आज मंगळवारी ६.३० वाजता रोटरी सभागृहात ज्येष्ठ वनस्पतितज्ज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी डॉ. बाचुळकर यांचे 'पश्चिम घाट आणि पर्यावरण' या विषयावर व्याख्यान होणार आहे, तर समारोप २५ सप्टेंबर रोजी होणार आहे. यावेळी डॉ. प्रियदर्शनी कर्वे यांचे 'कृती छोटी, परिणाम मोठा' या विषयावर व्याख्यान होणार आहे. बुधवार, दि. २४ रोजी सायंकाळी ६.३० वाजता सांगली स्मार्ट सिटी या विषयावर ॲड. असीम सरोदे मार्गदर्शन करणार आहेत.

किर्लोस्कर आणि वसुंधरा क्लबच्या पुढाकाराने होणारा हा किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव गेली ८ वर्षे पुण्यात आणि पाच वर्षे पुण्याबाहेर होत आहे. १७ ठिकाणी ४२ शहरापैकी २१ शहरात हा चित्रपट महोत्सव होत आहे. या वर्षीचा महोत्सव रिफ्युज, रिड्युज, रियुज, रिसायकल, रिकव्हर असा विषय आहे. सांगलीतील महोत्सवात भारत, बांगला देश, नेपाळ, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, अमेरिका, दक्षिण आफ्रिका, केनिया, जपान, टांझानिया, मंगोलिया आदी देशातील गाजलेले चित्रपट दाखवण्यात येणार आहेत.

## गृहमंत्री आर. आर. पाटील २५ ला अर्ज भरणार

तासगाव : प्रतिनिधी

गृहमंत्री आर. आर. पाटील गुरुवारी, २५ सप्टेंबर रोजी आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. त्यानंतर तासगाव शहरातून पदयात्रा व वंदेमातरम चौकात जाहीर सभा घेणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे तासगाव तालुकाध्यक्ष हणमंतराव देसाई यांनी दिली. एस. टी. स्टँडजवळील राष्ट्रवादीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अमोल शिंदे, डी. के. पाटील, खंडू पवार, कमलेश तांबवेकर, एम. बी. पवार, जाफर मुजावर आदी उपस्थित होते.